**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**गुरुवार**, दिनांक 19.07.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती .

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| पाटील विनय विश्वांबर | राऊत दिपक नरहरी |
| पाटील सुनंदा सुभाष | कल्याणकर ज्योती किशन |
| कल्याणकर बालाजी देवीदास | कदम ज्योती मनिष |
| तुप्पेकर संगीता सखाराम | मुळे कविता संतोष |
| देशमुख सतीश पुंडलीकराव | पवळे उमेश देवराव |
| पूरी कौशल्या शंकर | कोकाटे करुणा भीमराव |
| गाडीवाले संदिपसिंघ शंकरसिंघ | वाघमारे दयानंद नामदेव |
| बिरकले सरिता बालाजीराव | स्वामी शैलजा किशोर |
| चव्हाण आनंद शंकरराव | पिंपळे महेंद्र हिरामन |
| पावडे जयश्री निलेश | नेरलकर अपर्णा ऋषीकेश |
| खान फारुख अली इलीयाज खान | यन्नम राजेश लक्ष्मीनारायण |
| देशमुख वैशाली मिलींद | कनकदंडे महेश मारोतराव |
| रायबोले ज्योती सुभाष | चव्हाण उमेशसिंघ अशोकसिंग |
| पाटील संगीता विठ्ठल | खान अब्दुल अलीम खान अब्दुल जलील खान |
| सोनाळे दुष्यंत गणेशराज | येवनकर मोहिनी विजय |
| खान सलीमा बेगम नुरुल्ला खान | गड्डम नागनाथ दत्तात्रय |
| पवळे पुजा बालाजी | स्वामी किशोर मल्लीकार्जून |
| गाडीवाले मनमितकौर नरेंद्रसिंघ | तिडके प्रशांत विठ्ठल |
| गजभारे बापुराव नागोराव | शहाणे अल्का जगदीश |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | सय्यद शेर अली अ. महेबुब अली |
| रझीया बेगम बाबु खान | खान म.मसुद अहेमद खान उस्मान खान |
| अब्दुल सत्तार अ. गफुर | शमीम बेगम शेख जावीद |
| अ. रशिद अ. गणी | सोनकांबळे गंगाबाई मल्हारी |
| कुरेशी रेहाना बेगम चाँद पाशा | अब्दुल शमीम अब्दुल्ला साब |
| मोहम्मद साबेर चाउस मोहम्मद नासेर चाउस | अ. लतीफ अ. मजीद |
| शबाना बेगम मो. नासेर | फरहत सुलताना खुर्शीद अन्वर |
| कोकुलवार नागेश गोविंद | कापुरे गितांजली रामदास |
| अ. हफीज अ. करीम | आयेशा बेगम शे. असलम (बाबुभाई खोकेवाले) |
| फारुख हुसेन कासीम पिरान | सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ |
| खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ | रावत भानुसिंग गयादिनसिंग |
| तेहरा अमीतसिंग गोपालसिंग | मुथा कांताबाई प्रकाशचंद |
| यादव प्रभा इश्वरलाल | नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ |
| धबाले दिक्षा कपिल | शोएब आफाख स. मजहर हुसेन |
| अ. फयीम अ. मुनीर | मोरे दिपाली संतोष |
| गोरे शांता संभाजी | गुपिले बेबी जनार्धन |
| जाधव श्रीनिवास नारायणराव | देशमुख मंगला गजानन |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर हे होते तसेच मा. श्री लहुराज माळी आयुक्त, श्री कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्री रत्नाकर वाघमारे उपआयुक्त, श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता (साबांवि). श्री सुग्रीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, श्री माधव बाशेट्टी शहर अभियंता व महानगरपालिकेतील सर्व क्षेत्रीय कार्यालयातील सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात येते.

वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर** सभेचे काकाजास सुरुवात करण्यात येते.

**अ. सत्तार अ. गफुर** अफगानीस्थानवर जो हमला करण्यात आलेला आहे त्याचा आम्ही निषेध करतो. श्री साईनाथ जाधव सिडको यांचा मृत्यू झालेला त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**सभागृह नेता** शिख समाजाच्या काही नागरीकांची निघृण हत्या करण्यात आलेली आहे त्याचा मी निषेध नोंदवितो आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**बापुराव गजभारे** पंढरपुरच्या यात्रेत जाणा-या महीलेचा मृत्यू झालेला आहे. तीन्ही श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**उप महापौर** श्री साईनाथ जाधव सिडको यांचा मृत्यू झालेला आहे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी तसेच अफगाणीस्थानवर हमला केला व शिख समाजाच्या नागरीकांची निघृण हत्या केली त्याचा निषेध करण्याचा व पंढरपुरच्या यात्रेत जाणा-या महीलेचा मृत्यू झालेला आहे. तीसही श्रध्दांजली अर्पण करण्याच्या प्रस्ताव मांडण्यात आला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** अफगानीस्तान येथे झालेल्या हल्ला, व शिख समाजाच्या कांही नागरीकांची निघृण हत्या करण्यात आलेली आहे या दोन्ही हल्ल्याचे हि मनपा सभा सर्वानुमते निषेध करते, तसेच सिडको येथील श्री साईनाथ जाधव महाराजांचे निधन झालेले असुन व लोहा येथुन पंढरपुर यात्रेला जाणा-या एका नागरीकास विधुतचा शॉक लागल्याने मृत्यु झालेल्या नागरीकांना श्रध्दांजली अर्पण करण्यास मान्यता देण्यात येते

**ठराव क्रं. 60** **ठराव**

अफगानीस्तान येथे झालेल्या हल्ला, व शिख समाजाच्या कांही नागरीकांची निघृण हत्या करण्यात आलेली आहे या दोन्ही हल्ल्याचे हि मनपा सभा सर्वानुमते निषेध करते, तसेच सिडको येथील श्री साईनाथ जाधव महाराजांचे निधन झालेले असुन व लोहा येथुन पंढरपुर यात्रेला जाणा-या एका नागरीकास विधुतचा शॉक लागल्याने मृत्यु झालेल्या नागरीकांना हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते श्रध्दांजली अर्पण करते.

**सभागृह नेता** या जिल्हयाला श्री रामराव रातोळीकर हे आमदारकी भेटलेली आहे त्यांचे हे सभागृह त्यांचे अभिनंदन करतो. ते निश्चीत शहराचा विकास करण्यास आपल्याला सहकार्य करतील अशी अपेक्षा करतो.

**अ. सत्तार अ. गफुर** सभागृहनेता यांनी अभिनंदनचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे

**महापौर** जिल्हयाला श्री रामराव रातोळीकर हे आमदारकी भेटलेली आहे त्यांचे हे सभागृह त्यांचे अभिनंदन करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.61** **ठराव**

मा. श्री रातोळीकर राम पाटील यांनी महाराष्ट्र विधान परिषदेवर बिन विरोध निवड झाल्यामुळे त्यांचे हार्दिक अभिनंदन हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते करते.

**बालाजी कल्याणकर** टॅक्स दर वाढीचा मुददा आहे ती वाढ 40 टक्के का करण्यात आलेली आहे. याचा मला खुलासा देण्यात यावा. या टॅक्स वाढीला माझा विरोध आहे.

**आनंद चव्हाण** सदर विषय हा विषय पत्रीकेवर असल्याने त्याची आता चर्चा करण्यात येवू नये.

**उमेश चव्हाण** मार्चमध्ये बजेट मंजूर केले आहे परंतू आता पर्यत आम्हाला त्या बजेटची बुक मिळाली नाही त्यामुळे आम्ही विकासाची कामे कशी करावी याचा खुलासा करण्यात यावा. कोणत्या शिर्षकामध्ये किती पैसे आहेत हे आम्हाला कसे कळणार ?

**बालाजी कल्याणकर** टॅक्स दर वाढीचा मुददा आहे ती वाढ 40 टक्केचे बीले वाटप करण्यात आली आहेत काय याचा खुलासा करावा.

**उप महापौर** सदरचा विषय हा विषय पत्रीकेवर असल्याने त्यावेळी आपण मांडावा.

**नगरसचिव** बजेट बुक तयार झालेले आहे. सदरचे बजेट बुक हे सुटकेसमध्ये टाकुन दयावयाचे असल्याने ते प्रलबिंत राहीले आहे. दोन दिवसात सर्व स.सदस्यांना बुक देण्यात येईल.

**उमेश चव्हाण** आम्हाला सुटकेस नसली तरी चालेल आम्हाला बजेट बुक देण्यात यावे.

**आयुक्त** मा. महापौर महोदया, दोन दिवसात सुटकेसह बजेट बुक देण्यात येईल.

**अब्दुल रशीद** कोणत्या शिर्षकातुन किती खर्च होणार आहे याचा माहीती आम्हाला नाही. आम्ही विकासाची कामे कशी सुचवणार हे सांगा. ईदच्या काळात मोठया समस्या निर्माण झाल्या होत्या त्याची सोडवणुक कोण करणार याचा खुलासा करावा. एएमआरसीचे कामे कशी करावी हे आम्हाला सांगावे. ही कामे करण्यापुर्वी आयुक्त साहेबांनी मंजूरी दिल्याशिवाय कामे होत नाहीत अशी महत्वाची कामे केंव्हा होणार याचा खुलासा करावा.

**उमेश चव्हाण** आमच्या प्रभागात आतापर्यत मुरुमाची एक गाडी टाकण्यात आलेली नाही. पावसाळा संम्पल्यानंतर मुरुम टाकुन काय फायदा होणार आहे.

| | |
|---|---|
| **आयुक्त** | एएमआरसीचा कंत्राटदाराचे मागील 4 वर्षापासुन त्यास पैसे दिले नसल्याने तो काम करण्यास तयार होत नव्हता त्यास आता आपण पैसे देत आहोत त्यामुळे तो कामे करण्यास तयार झाला आहे. |
| **साबेर चाऊस** | दोन वर्षापासुन त्यास आपण पैसे दिले नसतील परंतू आमच्या वार्डातील कामे महत्वाचे आहेत ती कामे तात्काळ करुन द्यावे. |
| **सभागृह नेता** | आता नविन कंत्राटदार एएमआरसीचा आलेला आहे. मागचे पैसे देण्यासाठी तो आपणास ब्लॅकमेल करीत असेल तर त्यास आपल्यामार्फत ब्लॅकलिस्ट केले पाहीजे. |
| **उमेश चव्हाण** | सर्व प्रभागाची पहाणी करुन घ्यावी त्यास कार्यात्तर मान्यता घेण्यात यावी. मागील दिड महीण्यापासुन मी पाठपुरावा करीत आहे तरीही माझ्या प्रभागातील कामे होत नाहीत. म्हणुन मी एका तासासाठी सभागृह तहकुब करुन माझ्या प्रभागाची पहाणी करावी. मुरुम कैंव्हा टाकणार आहेत हे आम्हाला सांगावे. |
| | **गोंधळ सुरु होता.** |
| **सभागृह नेता** | आपण स्थळ करीत आहात ती चांगली बाब आहे यास आमचा विरोध नसुन त्याबाबत अभिनंदनच आहे. पण वास्तविक परीस्थितीत ही वेगळी आहे. वार्डात कामे होत नाही ती कामे करुन घेणे गरजेचे आहे. |
| **महापौर** | आतापर्यत जे प्रश्न उपस्थित झाले आहेत याचा प्रथम कार्यकारी अभियंता खुलासा करतील. |
| **कार्यकारी अभियंता (सांबावि)** | सर्व झोनमधील एएमआरसीचे कंत्राटदार नियुक्त करण्यात आलेले आहेत. फक्त झोन 4 व 5 चे एएमआरसी नियुक्त करावयाचे शिल्लक आहे ती त्वरीत करण्यात येतील. |
| **बालाजी कल्याणकर** | फाईलवर निर्णय का होत नाही फाईल या विभागाची त्या विभागाकडे जात असते हेच पहाणे आवश्यक आहे. |
| **आयुक्त** | एएमआरसीचा एक कंत्राटदार इएमडी देण्यास तयार नाही त्यामुळे ते आजच त्याचे कंत्राट रद्द करण्यात येईल. इतर कंत्राटदाराने कामे चालू करण्यासाठी आदेशीत करण्यात येईल. |
| **अब्दुल सतार** | आपल्याकडे इंजीनियर आहेत त्यांच्या मार्फत सर्व्हेक्षण करुन त्यांचा अहवाल घेण्यात यावा. त्याच्यानंतरच कामे काढावी सर्व कामे ही प्रभागवाईज देवून कामे करुन घ्यावे. प्रभागामध्ये जी रिकव्हरी आहे ती वसुल करावी त्या प्रमाणात त्यांच्या वार्डातील कामे करुन घ्यावे. आपले अधिकारी काय कामे करतात हे सांगा. एकदा लाईट बसवा असे सांगीतले की, शासन निर्णय दाखविण्यात येतो. त्याला काही पर्याय नाहीत काय हे सांगावे.आमच्या सर्वसाधारण सभेला अधिकार आहेत त्या अधिकाराचा आम्ही उपयोग करणार आहोत. मुरुम, जीएसबी व लाईट यासाठी आजच मिटींग घेवून सर्वाना आदेश दयावे व कामे चालू करावे. जे कामे करीत नाहीत त्यांच्यावर कार्यवाही करावी. |
| **स. शेर अली** | मी मागे कार्यकारी अभियंता यांना माझ्या प्रभागातील काम सांगीतले होते त्यावेळी ते सांगातात की कंत्राटदारास बोलावे परंतू आम्ही कंत्राटदारास का बोलावे. आम्ही अधिका-यास आमच्या प्रभागातील कामे करण्यास सांगू . इतर कोणालाही बोलणार  नाही नालीवरचे काम अदयापपर्यत झालेले नाही. म्हणुन यासाठी प्रभाग वाईज एएमआरसीचा ठराव पास केला होता यामुळे तात्काळ कामे होण्यास मदत होणार आहे. |
| **अब्दुल हफीज** | सर्व कामे ही वार्ड वाईज करण्यात यावे. ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणचे कामे होतील. एवढी मोठी महापालिका आहे त्यामुळे एकत्र कामे करणे चुक आहे. वार्डवाईज कामे केल्यास यात निधीची बचत होईल. |
| | **गोंधळ सुरु होता.** |
| **उप महापौर** | ज्या एरीयामधील एएमआरसीचे कामे सुरु झाली नाहीत किंवा कंत्राटदार करण्यास तयार नसेल तर अशा वेळी ज्या ठिकाणची एएमआरसी मंजूर आहे त्यांच्याकडून ही कामे करुन घेण्यात यावेत. |
| | **गोंधळ सुरु होता.** |
| **महेश कंदकदंडे** | आम्ही निवडून जवळपास 8 महीने झाले आहेत पण आम्ही एकही लाईट बसवू शकलो नाही. मुरुमाची एक गाडी टाकू शकलो नाही. वार्डात एकही काम करण्यास सुरुवात झालेली नाही, या ठिकाणी आपणास अन्शी नगरसेवक त्यांच्या वार्डातील समस्या सांगत आहेत परंतू आम्हाला आमच्या प्रभागातील 25 हजार लोकांना बोलावे लागत आहे.  प्रत्येक लोकाकडे अधिकारी वर्गाचे नंबर नाहीत त्यांच्याकडे नगरसेवकाचा नंबर आहेत त्यामुळे ते लोक आम्हाला कॉल करतात. उत्तरे देखील आम्हाला दयावे लागत आहे, आम्ही सांगीलले कामे प्रशासनाने करावे. प्रत्येक प्रभाग वाईज एमआरसी तयार करावी. व रु 15 लक्षापर्यत खर्च करण्याचे अधिकार नगरसेवकाला देण्यात यावे. |
| **राजेश यन्नम** | माझ्या प्रभागातील फोटो हे वृतपत्रात आलेले आहेत. इतकी वाईट अवस्था झालेली आहे. फोटो आल्यानंतर तरी कामे करावे असे मला वाटते. |

**दिपाली मोरे** धुमाळ वाडी या रस्त्यावर मोठ मोठे खडडे झालेले आहेत हे खडडे बूजविण्यात यावे. खडडे झाले असल्याने त्यात लहाण मच्छर होत आहे त्यामुळे आमचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. लहान मुलाना या रस्त्यावरुन जाण्यासाठी त्रास होत आहे त्यामुळे हे मोठे खडडे बुजविण्यासाठी संबधीताना आदेश देण्यात यावे.

**ज्योती कल्याणकर** प्रभाग क्रमांक 1 मध्ये किती खडडे किती झाले याची आपण स्वतः पहाणी करावी त्यानंतर आपल्या लक्षात येईल. माझ्या प्रभागात झालेले खडडे त्वरीत बुजविण्यात यावे अशी आपणास विनंती आहे. या खडडयामुळे अपघाताचे प्रमाणात वाढ झालेली आहे.

**ज्योती कदम** प्रभाग क्रमांक दोनमध्ये ड्रेनेज लाईनचे व पाण्याच्या लाईनचे काम झालेले आहे त्यामुळे या एरीयातील सर्व रस्ते खराब झालेले आहे हे रस्ते दुरुस्त करणे आवश्यक आहेत त्यासाठी सर्वात प्रथम या रस्त्यावर चुरी टाकण्यात यावी जेणेकरुन नागरीकांना चालणे साईचे होईल.

**मोहीनी येवनकर** प्रजावाणी कार्यालयाच्या शेजारी ड्रेनेज हे नेहमी तुंबून राहत असते. त्याची दुरुस्ती करण्यासाठी सुचना करुनही काम होत नाही. प्रजावाणी पेपरमध्ये याची बातमी प्रसिध्द झाली होती. घरातील निघालेला कचरा हा नाल्यामध्ये टाकतात त्यामुळे नाल्या या तुंबून राहतात. त्या स्वच्छ करण्यात याव्यात.

**संगिता पाटील** विजय नगर सोसायटी मध्ये वास्तव्यास आहे महात्मा फुले शाळा आहे त्या शाळेसमोरचा रस्ता नादुरस्त आहे तो त्वरीत दुरुस्त करुन दयावा. या रस्त्याची आयुक्त महोदयांनी पहाणी करुनच निर्णय घ्यावा. लोक आम्हाला रोज फोन करीत आहेत.

**दिक्षा धबाले** दोन महीण्यापासुन पावसाळा सुरु झालेला आहे. आणि सर्व नांदेड शहरातील समस्या आहेत ज्या प्रभागात मुरुम टाकणे आवश्यक आहे त्या एरीयामध्ये तात्काळ टाकण्याची कार्यवाही हाती घ्यावी. पावसाळा संपल्यानंतर मुरुम टाकुन काही फायदा होणार नाही. माझ्या प्रभागात पासवाचे पाणी लोकांच्या घरात जात आहे. मुरुम हा लवकरात लवकर टाकण्यात यावा. लाईटची देखील व्यवस्था नाही आमच्या वार्डात सापाच्या दोन तीन केसेस झालेल्या आहेत. लहान मुलाचा मृत्यू झालेला आहे. माझ्या वार्डात येवून पहाणी करावी अशी आपणास विनंती आहे.

**अब्दुल फईम** माझ्या वार्डात ज्या समस्या निर्माण झालेल्या आहे या फार गंभीर स्वरुपाच्या आहेत या कडे आपण लक्ष दिले पाहीजे. मा. आयुक्त महोदय आपले काम अत्यंत चांगले आहे शहरात असेच काम झाले पाहीजे. आपल्या कामाची मी प्रशंशा करतो.

**अर्पणा नेरलकर** नांदेड शहरातील सर्व जनावरे हे रस्त्यावर पडून राहत आहेत त्यासाठी आपल्या कोंडवाडयाची काय स्थिती आहे हे सांगावे. मोठ मोठया प्रशिक्षण संस्था आहेत मोठे कोचींन क्लासेस चालतात. रस्त्यावरचे खुप ठिकाणचे लाईट बंद आहेत. सर्व जनावरे ही कोंडवाडयात टाकावी. मागील दोन महीण्यात कच-याचे काम योग्य होते परंतू आता कोणीही एसआय प्रभागात येत नाही. गाडयामध्ये जीपीएस सिस्टीम लावण्यात यावी. प्रभाग क्रमांक 5 मध्ये रस्त्यावर येणारी घाण/ नालीचे पाणी/ड्रेनेज इत्यादीची कामे करुन घ्यावे. आनंद नगरला ड्रेनेज ब्लॉक झाले असे आम्ही तानाजी यांना सांगतो तो काम करीत नाही.

**शैलेजा स्वामी** आता ज्या महीला नगरसेविकेने जे प्रश्न मांडले आहेत ते अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत त्यामुळे प्रथम त्या प्रश्नाचा खुसाला आयुक्त महोदयांनी करावा.

**फारुख अली** खॉ आतापर्यत ब-याच नगरसेवकांनी आपल्या वार्डातील प्रश्न मांडले आणि म्हणाले की खुलासा करावा. या खुलास्याला काही अर्थ आहे की नाही. खुलासा झाला म्हणजे कामे झाले का. नाही प्रत्यक्षात कामे झालेले दिसत नाही. आम्ही आपणास किती दिवस खुलासे मागत राहणार आहोत. काही कामे होणार की नाहीत. मागील 15 वर्षापासुन मी निवडून येत आहे. पण प्रश्न काही सुटत नाहीत याचे कारण काय आहेत हे सांगा. लहान लहान कामे आम्ही अभियंत्याकडे घेवून जातो, आणि त्या ठिकाणी आम्हाला उत्तर मिळते काम होईल. काय चालू आहे हा प्रकार. लोकांची कामे प्रशासनाने करावे. आमच्या प्रभागातील लहान लहान कामे आम्ही सांगण्याची काय आवश्यता आहे ही कामे तर प्रशासनाने आपण स्वतः हुन केले पाहीजे. जे काम प्रशासनाचे आहे ते त्यांनी करावे. पिरनगरमध्ये ड्रेनेजचे काम करण्यात यावे.

**जयश्री पावडे** लोकांचे जे प्रश्न आहेत ते सोडविणे प्रशासनाचे व नगरसेवकांचे काम आहे. आमच्या महीलांनी जे प्रश्न मांडले ते आपण नक्कीच सोडवणार आहात. भाग्यनगर रस्त्यावर मोठे कोचींग क्लासेस आहेत त्याचे नियोजन करावे. शहरातील लाईट लावण्याबाबत काय कार्यवाही करता येते हे देखील पहावे.

**सतिश देशमुख** तरोडा भाग हा नव्याने समाविष्ठ झालेला आहे. या भागात आपण पहाणी केली आहे. त्या ठिकाणच्या समस्या फार मोठया आहेत. सर्वच नगरसेवकांना या समस्या बाबत माहिती आहे.आमच्या विरोधी पक्षातील नेत्याने शासनाकडून विशेष निधी आणुन या भागातील समस्या दुर कराव्यात. नगरविकास खात्याने 100 कोटीचे विशेष अनुदानाची मागणी करावी. तरोडा भाग हा चिखलमय झालेला आहे. दररोजचे 25 ते 50 ट्रक या वार्डात पडले पाहीजे अशी आपणास विनंती आहे. केवळ 10 गाडया आमच्या वार्डात टाकण्यात आल्या असतील. या कामाची स्पीड वाढवावी. लाईटही चालू करुन घ्यावे. आपली स्वायत संस्था आहे, स्वायत्त संस्था असल्याने एक विशेष अधिकारामध्ये आदेश पारीत करुन लाईट लावण्याचे काम हाती घ्यावे.

**बापुराव गजभारे** थोडाही पाऊस झाला की हींगोली गेटच्या अंडर ब्रिजमध्ये पाणी साचते. त्या ठिकाणच्या पाण्याचा निचरा योग्य वेळी करावा.

**फारुक बदवेल** मुख्यलेखाधिकारी हे कंत्राटदारासोबत योग्य वर्तन करीत नाहीत. कंत्राटदाराने काम केल्यानंतरच लेखा विभागात पैसे मागण्यासाठी जातात त्यावेळी मुख्य लेखाधिकारी योग्य पध्दतीचे वर्तन कंत्राटदारासोबत करीत नाही असे वांरवार दिसून येत आहे. नगरसेवकास देखील त्यांची वागणूक योग्य पध्दतीची नाही. आम्हाला वेळ देण्यात यावा. हा मुददा फार गंभीर आहे. ईदच्या काळाच पाणी मिळत नाही याचे कारण काय आहे याचा खुलासा करावा. अंधारे साहेब यांच्याकडे जास्त चार्ज होत असतील तर त्यांच्याकडील काम करुन घ्यावे. त्यांचे काम इतरांना दयावे.

**गोंधळ चालू होता.**

**महेंद्र पिंपळे** हर्षनगर मध्ये 3 ते 4 एकरचा पटटा आहे. या जागेवर काम करण्यासाठी बांधकाम परवानगी घेण्यात आली होती. शासनाने जवळ पास 40 लक्ष रुपये खर्च करुन चालू केले आहे. आमच्या एरीयातील मागील तीन महीण्यापासुन कामे थांविण्यासाठी मी संबधीत झोनल श्री इंगोले यांना सुचना केल्या होत्या परंतू त्याकडे ते गंभीरतेने पहात नाही. काहीतरी इतर प्रकार झाल्याचे दिसुन येते. चिरीमीरी करुन घरी बसले असे माझा कयास आहे. मनपाचे उत्पन वाढ झाले पाहीजे. कोचींग क्लासेसच्या समोर अनाधिकृत रस्त्यावर गाडया लावतात. विदयार्थ्यांच्या गाडयाची पार्कींग करण्याची जबाबदारी ही क्लासच्या संचालकाची आहे. या बाबीकडे आपण लक्ष घालावे.

**गुरुप्रितकौर सोडी** श्यामनगर नगर दवाखान्याच्या रस्त्यावर कोचींग क्लासेस वाल्यांनी फुटपाथवर सर्व कब्जा केलेला आहे. त्या ठिकाण वरुन जातांना लोकांना फार त्रास होतो. कोचींग क्लासेस वाल्यांची वाहने फुटपाथवर थांबणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

**स. शेर अली** आमचा वार्ड हा अविकसीत वार्ड आहे. आम्ही एक प्रस्ताव दिला होता की प्रभाग वाईज एएमआरसीचे कामे करण्यात यावी.

**महापौर** आयुक्तांनी खूलासा करावा.

**आयुक्त** महापौर महोदया, कोंडवाडयाच्या संदर्भात एका कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची प्रक्रीया चालु असून कंत्राटदाराने करार केला असून त्याचे आता काम चालू होईल . चुरीच्याबाबतचा एक एएमआरसीचा कंत्राटदार एका भागातील कामे करण्यासाठी करार करत नाही त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल. प्रत्येक प्रभाग निहाय किंवा ज्या प्रभागात कामे चालू आहेत त्याच कंत्राटदाराकडून चूरी टाकुन घेण्याचे काम करण्यात येईल. तरोडा कौठा भागामध्ये बरेच रस्ते खराब झाले आहेत या भागामध्ये आपले ड्रेनेजचे काम झाले आहे त्यामुळे हे रस्ते खराब झालेले आहेत. ड्रेनेज लाईनचे रीस्टोरेशनचे काम करणार आहोत. ज्या ठिकाणी काळया मातीचे रस्ते आहे ते रस्ते याच कंत्राटदाराकडून करुन 15 दिवसाचे आत करुन घेणार आहोत. आरअन्डबीच्या कंत्राटदाराने त्यांच्या गाडयावर जीपीएस सिस्टम बसविली पाहीजे. जीपीएस त्यांनी सुरु केलेले आहे सर्व नागरीकांना पाहण्यासाठी संबधीतास आम्ही सुचना देणार आहोत.ड्रेनेजच्या बाबत ब-याच तक्रारी आहेत. लहान चार गाडया आपण घेणार आहोत. तो आपला ड्रेनेजचा प्रश्न सुटू शकेल. लाईटच्या संदर्भात जो शासनाने जी आर काढला आहे परंतू ते काम करण्यात तो संबधीत कंत्राटदारार सक्षम नाही असे वाटते त्यामुळे आम्हीच ती लाईटचे तात्काळ करु.

हिंगोली गेट ब्रिजचे पाणी कसे थांविता येईल याचेही नियोजन करण्यात येईल. बजेटची प्रत आपणास देण्यात येईल. बीओटी तत्वावर जागा विकसीत करण्यात येतील यातुन आपणास बराच निधी मिळणार आहे. तसेच जाहीरातीचे धोरण निश्चीत करुन त्यातूनही आपणास निधी उपलब्ध करता येईल. मनपाचे उत्पन्न कसे वाढ करता येईल याकडे लक्ष देण्यात येणार आहे. चेकचा जो विषय आहे त्यात कंदेवार यांचा काही दोष नाही कारण मनपाकेकडे पैसेच नाहीत.

**उमेश चव्हाण** अमृत योजने अंतर्गत लाईन टाकण्याचे काम चालू आहे. त्या लाईनला कनेक्शन दिले जात नाही मग लाईन टाकुन काय फायदा हे सांगावे. याचा खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता(पापु)** अमृत योजने अंतर्गत शहरात 130 कि.मी लाईन टाकण्यात येणार आहे. आतापर्यंत कंत्राटदाराने 85 किमी लाईन टाकलेली आहे. क्रास कनेक्शन पुर्णपणे बाकी आहे. मागील मे महीना हा टंचाई महीना होता. त्यामुळे क्रास कनेक्शनचे काम केले नाही.

**उमेश चव्हाण** तो कंत्राटदार काम करीत नाही तो पळुन गेलेला आहे. सभागृहात दिशा भुल करण्याचे काम करु नये.

**गोंधळ सुरु होता.**

**उप महापौर** विषय पत्रीका चालु करण्यात यावी.

**महापौर** विषय पत्रीका चालू करण्यात यावी.

**<u>आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव</u>**

**विषय क्रं. 01**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/2135/18 दिनांक 19.05.2018 अन्वये **श्री राजेश कचरु जोंधळे, पुरुष मजुर यांना दिनांक 17.05.2018 रोजी -हदयविकाराचा धक्का आल्याने त्यांना महिंद्रकर चेस्ट हॉस्पीटल नांदेड येथे दाखल केले असून संबंधीत हे अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत.**

संबंधीतांनी दिनांक 18.05.18 अन्वये अर्ज सादर करुन वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीकरिता अग्रीम रक्कम रुपये 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष) देण्याची विनंती केली आहे.

नावाशमनपाकेतील कर्मचा-यांना राज्य शासकिय कर्मचा-यां प्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ देण्यासाठी नावाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 20 दिनांक 10.04.2018 नुसार मान्यता दिल्यानुसार मनपा अधिकारी / कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ देण्याकरिता कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/656/2018 दिनांक 16.04.2018 अन्वयें मान्यता प्रदान केली आहे.

करिता श्री राजेश कचरु जोंधळे पुरुष मजुर यांनी दिनांक 18.05.18 च्या अनुषंगाने अग्रीम रक्कम रु. 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त) अग्रीम देण्याची प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आलेली असुन **सदरील आदेशाची नोंद घेणे बाबत.**

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं.62** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/2135/18 दिनांक 19.05.2018 अन्वये **श्री राजेश कचरु जोंधळे, पुरुष मजुर यांना दिनांक 17.05.2018 रोजी -हदयविकाराचा धक्का आल्याने त्यांना महिंद्रकर चेस्ट हॉस्पीटल नांदेड येथे दाखल केले असून संबंधीत हे अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत.**

संबंधीतांनी दिनांक 18.05.18 अन्वये अर्ज सादर करुन वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीकरिता अग्रीम रक्कम रुपये 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष) देण्याची विनंती केली आहे.

नावाशमनपाकेतील कर्मचा-यांना राज्य शासकिय कर्मचा-यां प्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ देण्यासाठी नावाशमनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 20 दिनांक 10.04.2018 नुसार मान्यता दिल्यानुसार मनपा अधिकारी / कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ देण्याकरिता कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/656/2018 दिनांक 16.04.2018 अन्वयें मान्यता प्रदान केली आहे.

करिता श्री राजेश कचरु जोंधळे पुरुष मजुर यांनी दिनांक 18.05.18 च्या अनुषंगाने अग्रीम रक्कम रु. 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त) अग्रीम देण्याची प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आलेली असुन **सदरील आदेशाची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 02**

मा. आयुक्त कुटूंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्रं. NRHM/Urbam RCH/21458-21505/2011 दिनांक 24.08.11 नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मध्ये महाराष्ट्र शासनाने आर.सी.एच. फेस-2 कार्यक्रमा अंतर्गत आदेश क्रं. NRHM/Urban RCH/CPM-Appt/8168-89 दिनांक 17.10.2010 अन्वये कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतन रुपये 18,000/- (अक्षरी रुपये अठरा हजार फक्त) वर **सिटी प्रोग्राम मॅनेजर या पदावर श्री सुहास रघुनाथराव सोनुले** यांची नियुक्ती केली आहे. संबंधीतांचे वेतन दिनांक 31.03.2012 पर्यंत शासनाकडून अदाई करण्यात येत होते. त्यानंतर संबंधीतांचे वेतन मनपाकेच्या निधीतुन करावयाचे आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला ठराव क्रं. 84 दिनांक 19.12.17 नुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/अवि/जंद/463/18 दिनांक 09.01.18 अन्वये संबंधीतांचे प्रतिमहा एकत्रीत मानधन रुपये 30,000/- करण्यात आले.

यापुर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/16096/18 दिनांक 29.01.18 अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सभेची मान्यता अपेक्षीत धरुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/19185/18 दिनांक 27.03.18 अन्वये दिनांक 01.01.18 ते 29.06.18 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती व त्यास मनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 94 दिनांक 07.03.18 अन्वये मान्यता दिली होती.

महाराष्ट्र शासन आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त उपक्रमांतुन संपूर्ण राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी महानगरपालिकेस प्रोग्राम मॅनेजर या पदाची आवश्यक्ता असून तसेच संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचा संबंधीत विभागाने सादर केलेला आहे. संबंधीतांच्या सेवेची मुदत दिनांक 29.06.18 रोजी संपलेली असुन त्यांच्या सेवेत दि. 36.06.18 रोजीचा तांत्रीक खंड देवुन दि. 01.07.18 ते 30.12.18 पर्यंत मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.63** **ठराव**

मा. आयुक्त कुटूंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्रं. NRHM/Urbam RCH/21458-21505/2011 दिनांक 24.08.11 नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मध्ये महाराष्ट्र शासनाने आर.सी.एच. फेस-2 कार्यक्रमा अंतर्गत आदेश क्रं. NRHM/Urban RCH/CPM-Appt/8168-89 दिनांक 17.10.2010 अन्वये कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतन रुपये 18,000/- (अक्षरी रुपये अठरा हजार फक्त) वर **सिटी प्रोग्राम मॅनेजर या पदावर श्री सुहास रघुनाथराव सोनुले** यांची नियुक्ती केली आहे. संबंधीतांचे वेतन दिनांक 31.03.2012 पर्यंत शासनाकडून अदाई करण्यात येत होते. त्यानंतर संबंधीतांचे वेतन मनपाकेच्या निधीतुन करावयाचे आहे.

नांदेठ वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला ठराव क्रं. 84 दिनांक 19.12.17 नुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/अवि/जंद/463/18 दिनांक 09.01.18 अन्वये संबंधीतांचे प्रतिमहा एकत्रीत मानधन रुपये 30,000/- करण्यात आले.

यापुर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/16096/18 दिनांक 29.01.18 अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सभेची मान्यता अपेक्षीत धरुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/19185/18 दिनांक 27.03.18 अन्वये दिनांक 01.01.18 ते 29.06.18 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती व त्यास मनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 94 दिनांक 07.03.18 अन्वये मान्यता दिली होती.

महाराष्ट्र शासन आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त उपक्रमांतुन संपूर्ण राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी महानगरपालिकेस प्रोग्राम मॅनेजर या पदाची आवश्यक्ता असून तसेच संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचा संबंधीत विभागाने सादर केलेला आहे. संबंधीतांच्या सेवेची मुदत दिनांक 29.06.18 रोजी संपलेली असुन त्यांच्या सेवेत दि. 36.06.18 रोजीचा तांत्रीक खंड देवुन दि. 01.07.18 ते 30.12.18 पर्यंत मुदतवाढ हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.03**

नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिकेतील कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 09 वैद्यकिय अधिकारी/सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायजर-1 असे एकूण 10 कर्मचारी कार्यरत असुन त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता असुन व संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचे प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे व मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 113 दिनांक 30.11.16 अन्वये ठराव पारीत केल्यानुसार सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये 40,000/- वर व कंत्रसटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायजर यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये 15,000/- वर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-6/19184/18 दिनांक 27.03.18 अन्वये खालील अधिकारी / कर्मचारी यांची सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षीत धरुन सहा महिण्याची मुदतवाढ देण्यात आली होती ती मुदतवाढ दिनांक 29.06.18 रोजी संपत असल्यामुळे खालील एकूण 08 वैद्यकिय अधिकारी / सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायजर-1 असे एकूण 09 कंत्राटी कर्मचा-यांचा दिनांक 30.06.18 चा त्यांच्या सेवेत एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.07.18 ते 30.12.18 पर्यंत मुदतवाढ देणे करिता मान्यता घेऊन मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचा-यांचे नांव | पदनाम | एकत्रीत वेतन रुपये | तांत्रीक खंड दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | डॉ. प्राजली पंकजराव जोशी | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 02 | डॉ. पल्लवी राजेंद्र तुंगेनवार | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 03 | डॉ. मुजफर अमिना बेगम | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 04 | डॉ. कोटलवार श्रुती रविंद्र | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 05 | डॉ. राठोड विजया परशुराम | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 06 | डॉ. अब्दुल राफे अब्दुल खदीर | क. वैद्यकिय अधिकारी | 50,000/- | 30.06.2018 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 07 | डॉ. अन्सारी मो.राफे मो.इस्माईल | क. सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 08 | डॉ. रिजवान अहेमद गुलाम रसुल | क. सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 09 | श्री सोळंके राम मारोतराव | सिनिअर डॉटस व टीबी/ एचआयव्ही सुपरवायझर | 15,000/- | 30.06.2018 |

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.64** **ठराव**

नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिकेतील कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 09 वैद्यकिय अधिकारी/सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायजर-1 असे एकूण 10 कर्मचारी कार्यरत असुन त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता असुन व संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचे प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे व मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 113 दिनांक 30.11.16 अन्वये ठराव पारीत केल्यानुसार सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना दरमहा एकत्र्ीत वेतन रुपये 40,000/- वर व कंत्रसटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायजर यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये 15,000/- वर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-6/ 19184/18 दिनांक 27.03.18 अन्वये खालील अधिकारी / कर्मचारी यांची सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षीत धरुन सहा महिण्याची मुदतवाढ देण्यात आली होती ती मुदतवाढ दिनांक 29.06.18 रोजी संपत असल्यामुळे खालील एकूण 08 वैद्यकिय अधिकारी / सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायजर-1 असे एकूण 09 कंत्राटी कर्मचा-यांचा दिनांक 30.06.18 चा त्यांच्या सेवेत एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.07.18 ते 30.12.18 पर्यंत मुदतवाढ हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचा-यांचे नांव | पदनाम | एकत्रीत वेतन रुपये | तांत्रीक खंड दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | डॉ. प्राजली पंकजराव जोशी | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 02 | डॉ. पल्लवी राजेंद्र तुंगेनवार | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 03 | डॉ. मुजफर अमिना बेगम | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 04 | डॉ. कोटलवार श्रुती रविंद्र | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 05 | डॉ. राठोड विजया परशुराम | क. स्त्री वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 06 | डॉ. अब्दुल राफे अब्दुल खदीर | क. वैद्यकिय अधिकारी | 50,000/- | 30.06.2018 |
| 07 | डॉ. अन्सारी मो.राफे मो.इस्माईल | क. सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 08 | डॉ. रिजवान अहेमद गुलाम रसुल | क. सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | 40,000/- | 30.06.2018 |
| 09 | श्री सोळंके राम मारोतराव | सिनिअर डॉटस व टीबी/ एचआयव्ही सुपरवायझर | 15,000/- | 30.06.2018 |

**विषय क्रं.04**

**विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 52 नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन प्रशमित संरचना म्हणुन घोषीत करण्यासाठी अधिनियमाचे कलम 158(1) अन्वये केलेले नियम**

राज्यातील नागरी भागातील दिनांक 31.12.2015 पुर्वीच्या बेकायदेशिर बांधकामांना प्रथमित संरचना म्हणून घोषित करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 मध्ये सुधारणा करुन कलम-52(अ) नव्याने समाविष्ट करण्यात आला असुन याअंतर्गत कलम 158(1) नुसार तयार केलेले विनियमास शासन निर्णय क्रं. टिपीएस-1814/प्र.क्र.82/14/नियम/नवि-13 दिनांक 07.10.2017 अन्वये मंजुरी दिलेली आहे. या बाबत चे इंग्रजी विनियम दिनांक 10.10.2017 रोजीच्या महाराष्ट्रे शासन राजपत्रात तर मराठी विनियम दिनांक 02.02.2018 रोजीच्या महाराष्ट्र शासनप राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले आहे तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने यापुर्वी दै. लोकमत, दै. प्रजावाणी व दै. सकाळमध्ये अर्ज साद करणेसाठी दि. 01.01.2018 ते 30.06.18 पर्यंतची मुदत जाहिर सुचनेव्दारे दिलेली आहे.

मा. अव्वर सचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रं. टिपीएस-1814/प्र.क्र.82/14/भाग-3/नवि-13 दिनांक 19.06.2018 मध्ये दिनांक 07.10.2017 च्या विनियमातील तरतूद क्रं. 09 च्या अनुषंगाने स्पष्टीकरण दिउलेले आहे त्याप्रमाणे विनियमातील तरतुद क्रं. 09 मध्ये दिनांक 31.12.2015 पुर्वीचे अनाधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेसाठी अर्ज मागविण्यासाठी करावयाच्या प्रसिध्दीकरणामध्ये सहा महिन्यांची कालमर्यादा नमूद केली आहे या प्रसिध्दीकरणामध्ये अर्ज सादर करणेसाठी किती कालावधी द्यावयाचा याबाबत संबंधीत नियोजन प्राधिकरणांनीच निर्णय घेणेचा असून मुदतवाढविणेसाठी संबंधीत नियोजन प्राधिकरणानी त्यांचे स्तरावर कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. त्याप्रमाणे प्रसिध्दीकरणाबाबतची मर्यादिना दि. 19.08.18 पासून अर्ज घेण्याचा दिनांका साधारणपणे सहा महिणे म्हणजेच दि. 18.02.19 व यापुढे संपूर्ण कार्यवाही पूर्ण करणेकरिता साधारणपणे 01 वर्ष विचारात घेवुन दिनांक 18.02.2020 पुर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील विहित मुदतीनंतरचे प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

करिता प्रशमित संरचना म्हणून घोषिक करणेसाठी अर्ज मागविण्यासाठीची मुदतवाढ दिनांक 14.02.2019 पर्यंत मंजुर करणेच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेला प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 65** **ठराव**

**विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 52 नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन प्रशमित संरचना म्हणुन घोषीत करण्यासाठी अधिनियमाचे कलम 158(1) अन्वये केलेले नियम**

राज्यातील नागरी भागातील दिनांक 31.12.2015 पुर्वीच्या बेकायदेशिर बांधकामांना प्रथमित संरचना म्हणून घोषित करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 मध्ये सुधारणा करुन कलम-52(अ) नव्याने समाविष्ट करण्यात आला असुन याअंतर्गत कलम 158(1) नुसार तयार केलेले विनियमास शासन निर्णय क्रं. टिपीएस-1814/प्र.क्र.82/14/नियम/नवि-13 दिनांक 07.10.2017 अन्वये मंजुरी दिलेली आहे. या बाबत चे इंग्रजी विनियम दिनांक 10.10.2017 रोजीच्या महारार्ष्ट शासन राजपत्रात तर मराठी विनियम दिनांक 02.02.2018 रोजीच्या महाराष्ट्र शासनप राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले आहे तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने यापुर्वी दै. लोकमत, दै. प्रजावाणी व दै. सकाळमध्ये अर्ज साद करणेसाठी दि. 01.01.2018 ते 30.06.18 पर्यंतची मुदत जाहिर सुचनेव्दारे दिलेली आहे.

मा. अव्वर सचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रं. टिपीएस-1814/प्र.क्र.82/14/भाग-3/नवि-13 दिनांक 19.06.2018 मध्ये दिनांक 07.10.2017 च्या विनियमातील तरतूद क्रं. 09 च्या अनुषंगाने स्पष्टीकरण दिउलेले आहे त्याप्रमाणे विनियमातील तरतुद क्रं. 09 मध्ये दिनांक 31.12.2015 पुर्वीचे अनाधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेसाठी अर्ज मागविण्यासाठी करावयाच्या प्रसिध्दीकरणामध्ये सहा महिन्यांची कालमर्यादा नमूद केली आहे या प्रसिध्दीकरणामध्ये अर्ज सादर करणेसाठी किती कालावधी द्यावयाचा याबाबत संबंधीत नियोजन प्राधिकरणांनीच निर्णय घेणेचा असून मुदतवाढविणेसाठी संबंधीत नियोजन प्राधिकरणानी त्यांचे स्तरावर कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. त्याप्रमाणे प्रसिध्दीकरणाबाबतची मर्यादिना दि. 19.08.18 पासून अर्ज घेण्याचा दिनांका साधारणपणे सहा महिणे म्हणजेच दि. 18.02.19 व यापुढे संपूर्ण कार्यवाही पूर्ण करणेकरिता साधारणपणे 01 वर्ष विचारात घेवुन दिनांक 18.02.2020 पुर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील विहित मुदतीनंतरचे प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

करिता प्रशमित संरचना म्हणून घोषिक करणेसाठी अर्ज मागविण्यासाठी दिनांक 14.02.2019 पर्यंत मुदतवाढ देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 05**

नांदेड शहराच्या मंजुर सधारीत विकास योजनेमध्ये मौजा नांदेड मधील स.नं. 93/बी/1 तसेच न.भु.क्रं. 17864/2 पैकी 84 आर जागा इपी 21 नुसार सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शवलेली आहे. उक्त जागेत सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरा ऐवजी रहिवास वापर करणेसाठी **श्री नगरेश्वर वैश्य मंदिर नांदेड तर्फे अध्यक्ष श्री दिलीप रामचंद्रराव बंडेवार** यांनी दिनांक 03.05.2017 अन्वये मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये महाराय्ष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार कार्यवाही करणे बाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 35 दिनांक 26 मे, 2017 अन्वये फेरबदला बाबतचा ठराव समंत केला आहे.

प्रस्तावित फेरबदलाची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र मध्ये इंग्रजी व मराठी भाषेत दैनिक लोकमत मध्ये पृठ क्रं. 06 वर दिनांक 18.01.2018 रोजी प्रसिध्द झाली असुन व दैनिक गोदातीर समाचार मध्ये दिनांक 18.01.2018 रोजी या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

सदरील अधिसुचना प्रसिध्द झाल्यानंतर विहीत कालावधीत एकही हरकती व सुचना या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

वैयक्तीक बाधित मालमत्ताधारकांना पत्र क्रं. नरवि/4263 दिनांक 27.02.2018 च्या पत्राव्दारे वैयक्तीक नोटीस देवुन हरकती/सुचना/आक्षेप असल्यास कळविणे आले आहे.व दिनांक 03.03.2018 शनिवार रोजी स. 11.00 वाजता सुनावणी आयोजीत करण्यात आली त्यांचे म्हणणे एकुण घेण्यात आले आहे. व फेरबदलाच्या अनुषंगाने मालमत्ताधारकांनी फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सुनावणीच्या वेळी सांगितले आहे त्या प्रमाणे उक्त फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी पाठवण्यात यावा असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

तरी उक्त फेरबदलास मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये प्रस्ताव शासनास सादर करणेच्या मंजुरीसाठी नांदेड वाघाळा शहर महानरपालिका नांदेडच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.66** **ठराव**

नांदेड शहराच्या मंजुर सधारीत विकास योजनेमध्ये मौजा नांदेड मधील स.नं. 93/बी/1 तसेच न.भु.क्रं. 17864/2 पैकी 84 आर जागा इपी 21 नुसार सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शवलेली आहे. उक्त जागेत सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरा ऐवजी रहिवास वापर करणेसाठी **श्री नगरेश्वर वैश्य मंदिर नांदेड तर्फे अध्यक्ष श्री दिलीप रामचंद्रराव बंडेवार** यांनी दिनांक 03.05.2017 अन्वये मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार कार्यवाही करणे बाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 35 दिनांक 26 मे, 2017 अन्वये फेरबदला बाबतचा ठराव समंत केला आहे.

प्रस्तावित फेरबदलाची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र मध्ये इंग्रजी व मराठी भाषेत दैनिक लोकमत मध्ये पृठ क्रं. 06 वर दिनांक 18.01.2018 रोजी प्रसिध्द झाली असुन व दैनिक गोदातीर समाचार मध्ये दिनांक 18.01.2018 रोजी या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

सदरील अधिसुचना प्रसिध्द झाल्यानंतर विहीत कालावधीत एकही हरकती व सुचना या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

वैयक्तीक बाधित मालमत्ताधारकांना पत्र क्रं. नरवि/4263 दिनांक 27.02.2018 च्या पत्राव्दारे वैयक्तीक नोटीस देवुन हरकती/सुचना/आक्षेप असल्यास कळविणे आले आहे.व दिनांक 03.03.2018 शनिवार रोजी स. 11.00 वाजता सुनावणी आयोजीत करण्यात आली त्यांचे म्हणणे एकुण घेण्यात आले आहे. व फेरबदलाच्या अनुषंगाने मालमत्ताधारकांनी फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सुनावणीच्या वेळी सांगितले आहे त्या प्रमाणे उक्त फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी पाठवण्यात यावा असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

तरी उक्त फेरबदलास मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये शासनास सादर करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 06**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत चौकास / रस्त्यास नांव देण्याच्या उपसमितीची बैठक दिनांक 05.06.2018 रोजी ठराव क्रं. 01 अन्वये खालील रस्त्यास व चौकास नांव देण्यासाठी शिफारस केलेली असुन त्यावर निर्णय घेणे बाबत.**

| अ. क्र. | प्रस्तावकाचे नांव | रस्त्याचे, चौकाचे ठिकाण | द्यावयाचे नांव | शेरा | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री अमितसिंह गोपालसिंह तेहरा | प्रभाग क्रं. 17 मधील **डॉ. सजणे यांच्या दवाखाना ते श्री बरारा यांचे घरा पर्यंतच्या रस्त्यास नांव देणे बाबत** | **गुजराथी हायस्कूल रोड** | क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 4 वजिराबाद यांचे पत्र क्रं 383/18 दिनांक 17.03.2018 अन्वये सदरील रस्त्यास कोणाचेही नांव देण्यात आले नाही व कोणत्याही नावाचा नामफलक लावण्यात आलेला नाही असा अहवाल दिलेला आहे. | **संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरील ठिकाणी नांव देण्यास महासभेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते.** |
| 2 | सौ. कांताबाई प्रकाशचंद मुथा | प्रभाग क्रं. 17 मधील वजिराबाद चौरस्त्यास असे नांव देणे | **कै.बालचंद मुथा चौक** | क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 4 वजिराबाद यांचे पत्र क्रं 376/18 दिनांक 16.03.2018 अन्वये सदरील चौरस्त्यास कोणाचेही नांव देण्यात आले नाही व कोणत्याही नावाचा नामफलक लावण्यात आलेला नाही असा अहवाल दिलेला आहे. | **संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरील ठिकाणी नांव देण्यास महासभेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | अ. लतीफ, स. शेर अली, सौ. दिपाली मोरे. | नांवघाट ब्रिज ते लातुर रोड पर्यंतच्या रस्त्यास नांव देणे बाबत | **<u>भारताचे माजी महामहिम कै. ऐ. पि. जे. अबुल कलाम रोड</u>** | क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 6 सिडको यांचे पत्र क्रं. 2260/18 दिनांक 14.03.2018 अन्वये नावघाट बिज ते लातूर रोड पर्यंतच्या रस्त्यास यापुर्वी काणाचेही नांव देण्यात आलेले नाही. तथापि या रोडवर दोन चौक येत असुन त्यापैकी एका चौकास महर्षी मार्कंण्डे चौक व दुस-या चौकास महर्षी वाल्मिकी चौक असे नांवाचे बोर्ड लावलेला आहेत असा अहवाल दिलेला आहे. | **संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरील ठिकाणी नांव देण्यास महासभेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते.** |

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यांना, चौकांना व इमारतींना नाव द्यावयाचे असे तर त्या व्यक्तीचा प्रस्तावात अल्प परिचय, त्यांचे विविध क्षेत्रात केलेले कार्य, सामाजिक-राजकिय कार्य, शैक्षणिक कार्य, देशासाठी शहरासाठी राहिलेले योगदान चा उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच यापुढे सदर रस्त्यास व चौकास नांव द्यावयाचे असल्यास तो कमीत कमी किती फुटाचा असावा या बाबत पुढील सभेत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे हि मनपाकेची उपसमितीची सभा सर्वानुमते मान्यता देवुन महासभेस शिफारस करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**उमेश चव्हाण** — या विषय पत्रीकेत आमच्या प्रभागातील कामे प्रलबींत राहुन विषय पास करुन देणे हेच का आमचे काम ? ड्रेनेज साफ करण्यासाठी लेबर मिळत नाहीत. लेबरला एकही सुविधा नाही. पेमेंट भेटले नसल्याने लेबर येणार नाहीत. ते संपावर असतात. आम्ही या ठिकाणी शहराचे प्रश्न मांडत असतो. आम्हाला विकास दाखवा. एकही गिटटीचा कंण पडला नाही आमच्या वार्डात आम्ही लोकांना काय उत्तर दयावे याचा खुलासा करावा.

**राजेश यन्नम** — श्रीनगर या भागातील रामराव पवार मार्गावरील ड्रेनेज चोकअप होते गाडी येते साफ करुन जाते पुन्हा दोन दिवसानी तीच परिस्थीती तयार होते याकडे कोणी लक्ष देणार की नाही.

**उप महापौर** — आपसात चर्चा करण्यात येवू नये.

**गोंधळ सुरु होता.**

**बालाजी कल्याणकर** — कापडी पीशव्याचे टेन्डर रदद करुन सर्व काम बचत गटाकडून करुन घेण्यात यावे.

**बापुराव गजभारे** — विषय क्रमांक 6 च्या संदर्भात मला चर्चा करावयाची आहे. या सभागृहात 72 क ची चर्चा घडवून आणावयाची आहे. पेपरमध्ये उलट सुलट चर्चा होत आहे. महोदय, दिनांक 3 एप्रील 2018 रोजी टिळकनगर ते शिवनगर या रस्त्याला कै. गणपतराव मोरगे यांचे नांव देण्यासाठीचा प्रस्ताव मी दाखल केला, नगर सचिव कार्यालयाने क्षेत्रिय कार्यालय क्रं.2 अशोक नगर यांचे कडे दिनांक 5.4.2018 रोजी पत्र पाठविले. या प्रकरणाला 113 दिवस पूर्ण झालेले आहे. 72 क असे सांगते की, अधिकारी हा त्यांचे काम अत्यंत शिघ्रतेने करण्यास बांधील असेल अशी तरतूद आहे. एक दिवस, चार दिवस किंवा सात दिवसात आपल्याकडे येणे अपेक्षीत आहे.इतर विभागाकडे पाठविण्याचा कालावधी 45 दिवसाचा असेल. किंवा जास्तीत जास्त किचकट फाईल आहे त्यास 90 दिवसाचा कालावधी आहे. त्यापेक्षा जास्त दिवस असेल तर त्या अधिका-यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत असते. क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त सुधिर इंगोले यांच्यावर कारवाई झाली पाहीजे. 100 दिवस अहवाल देण्यास विलंब का लावला आहे हा विषय आहे. क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त सुधिर इंगोले यांच्यावर कडक कारवाई करणार की नाही याचा खुलासा करावा. संबधीताने एका ओळीचे पत्र पाठविले आहे.

**अब्दुल शमीम** — सन 2004 मध्ये पुरंदरे मॅडम यांनी त्यावेळी पिरबु-हान चौकास व चैतन्यनगरच्या रस्त्यास हजरत पिरबु-हान चौकास व रस्त्यास नांव यापुर्वीच दिलेले आहे त्यामुळे आता त्यास नांव देता येणार नाही.

**फारुक अली खाँ** पिरबु-हान चौकास हजरत पिरबु-हान व चैतन्यनगरच्या रस्त्यास हजरत पिरबु-हान रस्त्यास नांव यापुर्वीच दिलेले आहे त्यामुळे आता नांव देता येणार नाही. त्या दर्गावर 500 वर्षापुर्वीची आहे. त्यामुळे त्यावेळी ते नांव दिलेले आहे. नांव देण्यास आमचा विरोध नाही भाग्यनगर साईडच्या इतर कोणत्याही रस्त्यास नांव देण्यात यावे.

**बापुराव गजभारे** माझा विषय हा 72 क चा त्याबाबत मला खुलासा पाहीजे.

**सभागृह नेता** गजभारे साहेबांचा विषय आहे की एखादे पत्र नगर सेवकाने दिले आणि त्यावर प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. जर कार्यवाही केली नाही तर त्या अनुषंगाने अक्ट मध्ये तरतुदीनुसार संबधीतावर कार्यवाही करण्यात येईल असे 72 क मध्ये नमुद आहे. काम करीत असतांना कायदयाचे प्रोव्हीजन लक्षात ठेवून काम करावे हे त्यांना अपेक्षीत आहे. कोणत्या अधिका-यावर कार्यवाही व्हावी अशी त्यांची इच्छा नाही. एकादा अधिकारी तीन महीने कार्यवाही करीत नाही म्हणजे त्या ठिकाणी त्याची चुक आहे.अशा अधिका-यावर कार्यवाही करण्याची ते मागणी करीत आहेत. त्यानुसार कार्यवाही झाली पाहीजे. ज्या अधिका-याकडे जास्त दिवस पत्र नगरसेवकाचे राहील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे एक परीपत्रक काढण्यात यावे.

**बापुराव गजभारे** वजीराबाद मधील उडपी हॉटेलच्या बाजूच्या रस्त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग असा फलक होता. विकास कामामुळे हा फलक काढण्यात आला असावा. सदरचा फलक आता दिसुन येत नाही त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नांवाचा फलक सदरील ठिकाणी फलक बसविण्याची योग्य ती कार्यवाही करावी.

**गिताजंली कापुरे** संत गाडगे बाबा महाराज हे स्वच्छतेचे दुत होते. आपल्या शहरात कोठेही त्यांचे स्मारक नाही. संत गाडगे बाबा महाराज यांचे स्मारक बांधण्यात यावे.

**महापौर** मनपा हद्यीत रस्त्यास नांव देण्यासाठी संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार उपसमितीने नांव देण्यासाठी शिफारस केल्यामुळे सदरचे नांव देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**ठराव क्रं.67** **ठराव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत चौकास / रस्त्यास नांव देण्याच्या उपसमितीची बैठक दिनांक 05.06.2018 रोजी ठराव क्रं. 01 अन्वये खालील रस्त्यास व चौकास नांव देण्यासाठी शिफारस केलेली आहे.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यांना, चौकांना व इमारतींना नाव द्यावयाचे असे तर त्या व्यक्तीचा प्रस्तावात अल्प परिचय, त्यांचे विविध क्षेत्रात केलेले कार्य, सामाजिक-राजकिय कार्य, शैक्षणिक कार्य, देशासाठी शहरासाठी राहिलेले योगदान चा उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच यापुढे सदर रस्त्यास व चौकास नांव द्यावयाचे असल्यास तो कमीत कमी किती फुटाचा असावा या बाबत पुढील सभेत चर्चा करुन उपसमिती निर्णय घेतील. तसेच उपसमितीने केलेल्या शिफारशीनुसार खालील मनपा हद्यीतील रस्त्यांना नांव देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ. क्र. | प्रस्तावकाचे नांव | रस्त्याचे, चौकाचे ठिकाण | द्यावयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री अमितसिंह गोपालसिंह तेहरा | प्रभाग क्रं. 17 मधील **डॉ. सजणे यांच्या दवाखाना ते श्री बरारा यांचे घरा पर्यंतच्या रस्त्यास नांव देणे बाबत** | **गुजराथी हायस्कूल रोड** | क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 4 वजिराबाद यांचे पत्र क्रं 383/18 दिनांक 17.03.2018 अन्वये सदरील रस्त्यास कोणाचेही नांव देण्यात आले नाही व कोणत्याही नावाचा नामफलक लावण्यात आलेला नाही असा अहवाल दिलेला आहे. |
| 2 | सौ. कांताबाई प्रकाशचंद मुथा | प्रभाग क्रं. 17 मधील वजिराबाद चौरस्त्यास असे नांव देणे | **कै.बालचंद मुथा चौक** | क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 4 वजिराबाद यांचे पत्र क्रं 376/18 दिनांक 16.03.2018 अन्वये सदरील चौरस्त्यास कोणाचेही नांव देण्यात आले नाही व कोणत्याही नावाचा नामफलक लावण्यात आलेला नाही असा अहवाल दिलेला आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | अ. लतीफ, स. शेर अली, सौ. दिपाली मोरे. | नांवघाट ब्रिज ते लातुर रोड पर्यंतच्या रस्त्यास नांव देणे बाबत | **भारताचे माजी महामहिम कै. ऐ. पि. जे. अबुल कलाम रोड** | क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 6 सिडको यांचे पत्र क्रं. 2260/18 दिनांक 14.03.2018 अन्वये नावघाट बिज ते लातूर रोड पर्यंतच्या रस्त्यास यापुर्वी काणाचेही नांव देण्यात आलेले नाही. तथापि या रोडवर दोन चौक येत असुन त्यापैकी एका चौकास महर्षी मार्कण्डे चौक व दुस-या चौकास महर्षी वाल्मिकी चौक असे नांवाचे बोर्ड लावलेला आहेत असा अहवाल दिलेला आहे. |

**स. सदस्या मार्फ आलेले प्रस्ताव/सुचना**

**विषय क्रं. 07:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील मालमत्ता करा बाबत फेर सर्व्हेक्षण व फेर मुल्यांकन मोजमाप न होता मालमत्ताधारकांना मालमत्ता करा बाबत खास नोटीस काढण्यात आलेले आदेश रद्द करणे बाबत.

**सुचक :-** स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक :-** आनंद चव्हाण, अ. सत्तार अ. गफुर

**सभागृह नेता** विषयच्या अनुषगांने आयुक्त महोदय आपण यात काही आदेश पारीत केले आहेत काय याची माहीती सभागृहाला देण्यात यावी. महानगरपालिका ही 40 टक्के वाढीव नोटीसा देणार आहे. आयुक्त सर आपण हा आदेश काढण्यापुर्वी मा. महापौर, उप महापौर यांच्या समवेत चर्चा केली काय याचीही माहीती देण्यात यावी. 40 टक्के वाढ करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत काय ते विषय जीबी समोर येणे आवश्यक नाही काय ? जीपीएस सर्व्हे करण्यासाठी वेळ लागत असेल तर लोकांवर त्या कराचा भार का टाकत आहात. आयुक्तांनी जो त्याच्या अधिकारात निर्णय घेतला आहे त्याचा आम्ही विरोध करीत आहो. आम्ही मनपाचे उत्पन्न वाढी साठी प्रशासनास सहकार्य करु. परंतू कीती वाढ करावी हे धोरण ठरले पाहीजे. आरआर जरी 200 ते 300 वाढ झाली असेलही परंतू सर्व सामान्य नागरीकांना या वाढीचा त्रास झाला नाही पाहीजे. आपणास माहीत आहे की 5 वर्षाला टॅक्स मध्ये कीती वाढ करावी. परंतू सर्व आकडेवारी आमच्या समोर आली पाहिजे त्यानंतरच हा निर्णय घेण्यात येईल. मागच्या वर्षी ज्या दराने नोटीसा वाटप केल्या होत्या त्याच दराने नोटीसा वाटप करण्यात याव्यात. जीपीएस सर्व्हेचे काम पुर्ण करुन घ्यावे. आगाऊ टॅक्स वाढीचा जो आदेश निर्गमित करण्यात आला आहे तो आताचे आता मागे घेण्यात यावा.

**अब्दुल सत्तार** आपली पहीली महानगरपालिका होती की राज्यात आरआर प्रमाणे टॅक्स लावण्यात आला. आता आपण सर्व्हेची मान्यता दिलेली आहे. 40 वाढीच्या ज्या नोटीसा काढल्या आहे त्या चुकीच्या आहेत. हा विषय सभागृहासमोर सर्व आकडेवारी सह सादर करावा त्यानंतर यावर निर्णय घेण्यात येईल. 40 टक्के वाढीचा आदेश काढला आहे तो रदद करण्यात यावा.

**गुरुप्रीतकौर सोडी** मनपाचा टॅक्स वाढ करण्याचा विषय आहे. आम्ही भाजपाकडून याला विरोध आहे. शहरातील ब-याच रस्त्यावर खडडे पडले आहेत ते खडडे बुजविण्यात यावे सिडको, अण्णाभाऊ साठे चौक, तरोडा एरीया, बुंगई याच्या घरासमोरचा रस्ता व इतर रस्त्यावरील खडडें बुजविण्यात यावे. या ठिकाणी आम्ही चागले पाणी पीत आहोत आणि नांदेडच्या जनतेस खराब पाणी पाजत आहोत हे योग्य नाही. कच-याची समस्या सोडवावी.

**स. शेर अली** जीआयएस सिस्टने सर्व्हेचे काम चालू आहे ज्या मालमता नविन आहेत त्या टॅक्सच्या नेट मध्ये आल्या पाहीजे. त्याचा सर्व्हे पहील्यांदा करण्यात यावा. नविन सर्वेच्या मध्ये नविन इमारती पॉलीगॉनमध्ये दिसून येत नाहीत. त्या मालमता घेण्यात याव्यात. जून्या लोकांना याचा बोजा पडणार आहे काय याचा खुलासा करावा.

**बालाजी कल्याणकर** 40 टॅक्स वाढीला शिवसेनेचा विरोध राहील. तो आदेश रदद करण्यात यावा.

**आयुक्त** आताच शेरअली या सदस्यांनी जो मुददा मांडला आहे त्या नविन मालमता सुटणार नाहीत याची आपण काळजी घेणार आहोत. सालसन 2012-2013 ला रेडी रेकनर प्रमाणे टॅक्स वाढ केली होती. आता या पाच वर्षात रेडि रेकनरमध्ये 200 ते 300 वाढ झालेली आहे. सर्व्हेक्षण हे चालू आहे. 25 ते 30 टक्के मालमत्तेचे सर्व्हेक्षण झालेले आहे. तसे पाहीले तर मागच्या वर्षीच वाढ करणे आवश्यक होते मागच्या वर्षी निवडणूक असल्याने वाढ केलेली नाही. 40 टक्यापर्यत वाढ करण्याची तरतूद आहे. जी शास्ती आहे ती शास्ती कमी केलेली आहे. एक रुम जास्तीची बांधली असेल तर सर्व

इमारत ही अनाधिकृत म्हणून शास्ती लावण्यात आलेली आहे. ती डबल असल्याने तो भार काही टॅक्स धारकाचा कमी होणार आहे. टॅक्समध्ये वाढ केली तरी काही लोकांचा टॅक्स हा कमी होणार आहे.शासनाचे कर आपण काही वाढ करीत नाहीत. 20 ते 25 केसचा अभ्यास करुन त्यात काय होते याची आकडेवारी आपणा समोर आणण्यात येईल. रेडि रेकनर नुसार टॅक्सला सर्वसाधारण सभेने मंजूरी दिल्यानंतर पुन्हा सर्वसाधारण सभेच्या समोर येण्याची आवश्यकता नाही. तरीही परंतू 20 ते 25 केसेसचा अभ्यास करुन ते सभेच्या समोर आणण्यात येईल काय होते ते आपल्याला दर्शविण्यात येईल.

**सभागृह नेता** रेडिरेकनर मध्ये 0.5 टॅक्स सभेने मर्यादा घालून दिलेली आहे त्यात कमी जास्त केल्यास ती वाढ होणार किंवा कमी होणार आहे. रेडिरेकनर वाढ झाली तर ती मनपाने वाढ केली असे होणार नाही ती वाढ रेडिरेकनर मुळे होणार आहे. जीबीने मंजूरी दिल्यानंतर आयुक्ताला अधिकार आहेत हे बरोबर आहे. फेर मुल्यांकन सर्व्हेक्षण झाल्यानंतर येवू दयावे त्यात काय आकडेवारी येते त्याचा आपण अभ्यास करु. नागरीकांना वाढ दिसुन नये व मनपाचे उत्पन्न ही वाढ झाले पाहीजे. आपण एकतर्फी कार्यवाही करु नये अन्यथा आम्ही शासनाकडे जावू. आम्ही नागरीका सोबत आहोत. टॅक्समधुन आपणास किती उत्पन्न घ्यावयाचे हे ठरवावे लागेल. जो आपण आदेश काढला आहे तो आदेश मागे घ्यावा.

